माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ /२८७०/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| संजयकुमार गवळी | क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी नगररोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका | महापालिका सहाय्यक आयुक्त महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय, नगररोड वडगावशेरी पुणे महानगरपालिका |

**(सुनावणी दिनांक- ०२.०७.२०२६)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि.१४.०७.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हजर आहेत. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २५.०२.२०२५ | १) नगररोड-वडगांवशेरी क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत चंदननगर खराडी परिसरात कोणाही व्यक्तीचा मृत्यू झाल्यावर नातेवाईक लोकांना मयत पास अंत्यविधी पास मिळण्यासाठी नजीकची जी केंद्रे आहेत त्याची सविस्तर माहिती. केंद्राची संख्या, पत्ता, वेळा, ई माहिती २) एखाद्याचा मृत्यू जर कार्यालयीन वेळ संपल्यानंतर अथवा सुट्टीच्या दिवशी झाल्यास नगररोड-वडगांवशेरी क्षेत्रीय कार्यालयाने अंत्यविधी पास उपलब्ध करून देण्यासाठी जी सोय /पर्यायी व्यवस्था केलेली असेल त्याची माहिती. नगररोड वडगांवशेरी च्या अंतर्गत येणाऱ्या संपूर्ण परिसरात असे २४ तास ३६५ दिवस केंद्र असेल त्याची माहिती नसेल तर महानगरपालिका अधिनियम नुसार ते नसण्यामागील अधिकृत भूमिका स्पष्ट करणारी माहिती. तसेच या विषयास अनुसरून इतर २ मुद्यांची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, "माहिती दिली नाही. मी खराडीची माहिती मागीतली असता येरवडयाची माहिती दिली. मागणी केलेली माहिती दिली नाही. चुकीचे उत्तर दिले आहे."

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे आयोगाची पूर्व परवानगी न घेता सुनावणीकामी गैरहजर आहेत ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०४.२०२५ च्या पत्रान्वये उपलब्ध माहिती दिल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी दि. २९.०४.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मागणी केल्याप्रमाणे व अपिलार्थीस मुद्या क्र. १ व २ ची माहिती मिळाल्याने व मुद्या क्र. ३ व ४ ची माहिती विभागीय वैद्यकीय अधिकारी यांचेशी समन्वय साधून तसे त्यांना पत्राद्वारे सूचित करुन माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिल्याचे दिसून येते. प्रथम अपिल आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे दिसून येत नाही.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(दोन) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय, नगररोड वडगावशेरी, पुणे महानगरपालिका यांना या प्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने व विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त करून घेऊन कलम ७(६) नुसार शीघ्र डाकेने विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ/२८७०/२०२५/पुणे 4324/2026 दिनांक - 23/9/2026.